# PROFIT ADVERTISERS (INDIA) Pvt. Ltd.

| | PRESS CLIPPING | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Client | Agrovision (1st Day) | | | | |
| Publication | Sakal | | | | |
| Language | Marathi | Place | Nagpur | Date | 12/11/16 |

# उसासाठी ठिबक सिंचनाची सक्ती

## मुख्यमंत्री फडणवीस : सरकारच लवकर आणणार धोरण

८वे अॅग्रो व्हिजन

सकाळ वृत्तसेवा

नागपूर, ता. ११ : उसाचे पीक घ्यायचे असेल, तर शेतकऱ्यांना ठिबक सिंचनाची सोय करावी लागणार आहे. याबाबतचे धोरण लवकरच राज्य सरकार तयार करणार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले.

रेशीमबाग येथे आयोजित आठव्या अॅग्रो व्हिजनच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. मुख्यमंत्री म्हणाले, पूर्वीच्या सरकारने शेतकऱ्यांचे ठिबकचे साडेसातशे कोटी रुपये थकविले. त्यामुळे ठिबक सिंचनाच्या लाभार्थ्यांना अनुदान वेळेत मिळाले नाही. आता हा निधी देण्यात आला. त्यामुळे ठिबक सिंचनाचे वाटप बंद करण्यात आले. उसाच्या पिकाला पाणी जास्त लागते. ठिबक सिंचनासंदर्भात राज्य सरकार नवीन धोरण तयार करीत आहे. यानुसार, उसाच्या पिकासाठी ठिबक सिंचन सक्तीचे करण्यात येईल.

सरकार, ऊस कारखानदार आणि शेतकरी यांच्यात करार करण्यात येईल. ठिबक सिंचनासाठी शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध करून दिले जाईल. यावरील ५० टक्के व्याज सरकार देईल. तर २५ टक्के कारखानदार आणि २५ टक्के व्याजाची रक्कम लाभार्थी भरेल. यामुळे कमी पाण्यात जास्तीत जास्त उत्पादन घेता येणार आहे. उसाला पिकासाठी पाणी मोठ्या प्रमाणात पाणी लागते. पाण्याचे नियोजन आणि योग्य उपयोग होणे आवश्यक आहे. ठिबकसाठी धोरण ठरविताना गडकरींनी सुचविलेल्या मार्गदर्शक सूचनांचा समावेश त्यात केला जाईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली. गेल्या दीड वर्षात विदर्भ व मराठवाडा सर्वाधिक कृषिपंप वितरण केले आहे. कृषी फिडर करून ४ हजार सोलर मेगावॉट वीज तयार करण्यात येणार असून दिवसा १२ तास वीज शेतकऱ्यांना देण्यात येईल. येथील नेत्यांमुळेच दूध डेअरी व्यवसायचे नुकसान झाल्याचा टोलाही त्यांनी लावला.



रेशीमबाग : अॅग्रोव्हिजन कृषी प्रदर्शनात स्टॉलसमोरील बैलबंडीची पाहणी करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी.

## आजच्या कार्यशाळा

अॅग्रोव्हिजन राष्ट्रीय कृषी प्रदर्शनस्थळी शेतकऱ्यांकरिता विविध विषयांवर कार्यशाळा उद्या शनिवारी होत आहेत. कार्यशाळेचे उद्घाटन गुजरातचे मुख्यमंत्री विजय रुपानी यांच्या हस्ते होणार असून, अध्यक्षस्थानी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी राहतील. प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रीय सूक्ष्म, लघू, मध्यम उद्योग राज्यमंत्री गिरीराज सिंह, कृषिमंत्री पांडुरंग फुंडकर, पशुसंवर्धन व दुग्ध, मत्स्योद्योग मंत्री महादेव जानकर उपस्थित राहतील. शेतकऱ्यांकरिता सेंद्रिय शेती व प्रमाणीकरण, फुलशेती, पीकविमा, हरितगृह तंत्रज्ञान, संत्रा उत्पादन आणि प्रक्रिया, अन्नप्रक्रिया, कोल्डचेन व्यवस्थापन, ऊस, नाबार्डच्या शेती पतपुरवठा योजना, डेअरी चारा व्यवस्थापन, स्वच्छ दूध उत्पादन, चारा व्यवसाय यांचा समावेश आहे.